रुपये 7,24,950/- (अक्षरी रुपये सात लाख चौवीस हजार नऊशे पन्नास फक्त) एवढी अनर्जित रक्कम शासन जमा करण्याच्या अटीसह खालील अटी व शतीवर उक्त अकृषिक वापरातील निवासी भूखंडाचे खरेदी/विक्री व्यवहारास याव्दारे मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

अटी व शर्ती

1) जमीन व त्यावरिल बांधकामासाठी सदर आदेश निर्गमित करण्यापूर्वी अनर्जित रक्कम/हस्तांतरण शुल्क रुपये 7,24,950/- खजिनादाखल करणे, अनिवार्य राहील.
2) सदर भूखंड जेव्हा विक्री करण्यात येईल तेव्हा करारनाम्यात दर्शविलेल्या रक्कम ही त्यावेळेसच्या शिघ्रसिध्द गणकानूसार येणाऱ्या मुल्यांकनात वाढ झाल्यास फरकाच्या रकमेच्या 50 टक्के अनार्जित उत्पन्नाची रक्कम वसूल केल्याशिवाय सदर भूखंडाची विक्रीची परवानगी देण्यात येवू नये.
3) खरेदीदारास सदर निवासी अकृषिक जमीन वर्ग-2 हक्कानेच धारण करेल व जमिनीचे वहिवाटीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतूदी तसेच याबाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देश व अटीचे पालन करणे, अनिवार्य राहील.
4) विषयाकिंत भूखंड खरेदी/विक्री हस्तांतरणाच्या अनुषंगाने शासनाच्या ज्या काही अटी व शर्ती राहतील त्यासह हस्तांतरण शुल्क शासनास अदा करण्याबाबत आवेदक श्री. नामदेव सदु सोनवणे, रा. c/o श्री. रमेश झुंगरे, प्लॉट नं. 232, गुरुदेव नगर, जवाहर हौसिंग सोसायटी, नागपूर यांच्याकडून प्रतिज्ञापत्र घेतल्याशिवाय सदर भूखंडाची विक्रीची परवानगी देण्यात येवू नये.
5) खरेदीदारास उक्त मालमत्ता हस्तांतरणापूर्वी त्यावरिल कर्ज, बोजा, कब्जा, ताबा, वहिवाट, गहाण इत्यादीसंबंधी वाद नसेल याची खबरदारी घेणे आवश्यक राहील.
6) प्रश्नाधिन मालमत्तेच्या निवासी प्रयोजनासाठीच वापर करणे अनिवार्य राहील.
7) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकिय जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम 1971 च्या सर्व अटी व शर्ती आवेदकास बंधनकारक राहील.
8) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 अन्वये विहीत नमून्यातील सनद/करारनामा नोंदणीकृत करण्यास तहसिलदार, कामठी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(मुळ प्रत मा.जिल्हाधिकारी द्वारा अनुमोदित)

स्वा/-
(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी, नागपूर

प्रत :- 1) उपविभागीय अधिकारी, मौदा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित. यासोबत मुळ प्रकरण क्र. 01/एम.आर.सी.-81/2015-2016 परत पाठविण्यात येत आहे.
2) तहसिलदार, कामठी यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस.
3) श्री. नामदेव सदु सोनवणे, रा. c/o श्री. रमेश झुंगरे, प्लॉट नं. 232, गुरुदेव नगर, जवाहर हौसिंग सोसायटी, नागपूर यांना माहितीकरिता रवाना.

(सुभाष न. चौधरी)
उपजिल्हाधिकारी (महसूल)
जिल्हाधिकारी,नागपूर
करिता